# प्रेस नोट

दिनांक २२.०२.२०२१

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकांचे नाव, पद व कार्यालय | श्री. निलेश शरद जाधव वय ३५ वर्षे, पद तलाठी वर्ग ३, सजा हिवराखंड ता.लोणार जि.बुलडाणा रा. संभाजीनगर चिखली ता. चिखली जि.बुलडाणा |
| मागीतलेली लाचेची रक्कम | ५००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३००/– |
| घटनास्थळ | जगदीश नागरे यांचे दुकानासमोर, बिबि ता. लोणार जि. बुलडाणा |
| घटना तारीख व वेळ | दिनांक २२.०२.२०२१ चे १५.१४ वा |

**थोडक्यात हकिकत :–**

यातील तक्रारदार यांना शेतातील विहीरीची नोंद सातबाऱ्यावर करुन देण्यासाठी यातील लोकसेवक श्री. निलेश शरद जाधव वय ३५ वर्षे पद तलाठी हिवराखंड यांनी तक्रारदार यांना ५००/– रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतत तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक २२.०२.२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता लोकसेवक तलाठी श्री. जाधव यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांना शेतातील विहीरीची नोंद सातबाऱ्यावर करुन देण्यासाठी तडजोड अंती ३००/– रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने सापळा कार्यवाही आयोजीत करण्यात आली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन ३००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारली.

लोकसेवक श्री. निलेश जाधव वय ३५ वर्षे पद तलाठी वर्ग ३ सजा हिवराखंड ता. लोणार जि. बुलडाणा रा. संभाजीनगर ता. चिखली यांना ताब्यात घेवुन लाचेची रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेवक यांनी आपल्या लोकसेवक पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैशाचे स्वरुपातील आर्थिक लाभ मिळविण्यासाठी लोकसेवक पदाला न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचेविरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही, १) मा.श्री. विशाल गायकवाड, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
२) मा. श्री. अरुण सावंत, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधिक्षक श्री. संजय चौधरी, पोलीस निरीक्षक श्री. श्रीकांत निचळ व सापळा पथकातील स्टॉफ–पोना विलास साखरे, प्रविण बैरागी, पोकॉ विनोद लोखंडे, मपोकॉ स्वाती वाणी, चालक पोकॉ मधुकर रगड यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ तसेच टोल फ्री. क्रमांक. १०६४ यावर सपंर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी केले आहे.

( श्रीकांत निचळ )
पोलीस निरीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा

Scanned with CamScanner